सकाळ - 28-02-2020




कोल्हापूर : कमला कॉलेजमध्ये पदवी प्रमाणपत्र सोहळ्यात बोलताना व्ही. एन. देशपांडे. शेजारी प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्राजक्त पाटील, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. पी. एस. पाटील.

# कमला कॉलेजमध्ये पदवीदान समारंभ उत्साहात

टेंबलाईवाडी, ता. २७ : येथील ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ झाला. उद्योगपती व्ही. एन. देशपांडे यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

व्ही. एन. देशपांडे म्हणाले, "शिक्षण हे एखाद्या विषयाच्या सर्वांगीण अभ्यास व व्यक्तिमत्त्व विकासासाठी गरजेचे आहे. विद्यार्थिनींनी जिज्ञासा जागृत ठेवून व्यापक विचार करायला शिकावे. स्वतःची ध्येये ठरवावीत. आजचे शतक हे ज्ञानाचे शतक आहे. त्यामुळे नवे बदल स्वीकारा व पर्याय शोधायला शिका."

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, "मुलींनी संभाषण कौशल्य आत्मसात करावे. आज महाविद्यालयात कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करून उच्च शिक्षणाला व्यावसायिकतेची जोड दिली. एस समर्थ स्त्री म्हणून यशस्वी व्हा. संकटांना तोंड द्या व स्वतःचा विकास साधा." प्रास्ताविक प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एस. एन. पवार, प्राजक्त पाटील, कांचन पाटील, जयश्री पाटील, चंद्रशेखर यादव उपस्थित होते. स्वागत डॉ. सुजय पाटील यांनी केले. डॉ. निता धुमाळ यांनी पदवीची उद्घोषणा केली. प्रमाणपत्राचे वाचन प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी तर आभार प्रा. रेखा पंडित यांनी मानले. डॉ. आझाद नायकवडी यांनी संस्थागीत सादर केले.

सकाळ - 28-02-2020

Scanned by CamScanner